**"डिसेंबर २०२१" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक १ डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये श्री.सीताराम कुंटे, भाप्रसे (१९८५) यांची सेवानिवृत्तीनंतर मुख्यमंत्री कार्यालयात "प्रधान सल्लागार" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- दिनांक २ डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील सरळसेवेच्या पदांचे मागणीपत्र विनाविलंब आयोगाकडे पाठविण्याच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबतची प्रमाणित कार्यपद्धती (SOP) प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २ डिसेंबर २०२१ च्या शासन पत्रान्वये केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या दिनांक २५ ऑक्टोबर २०२१ च्या ज्ञापनान्वये, दिनांक १ जुलै २०२१ पासून महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना वाढीव ३% महागाई भत्ता लागू करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १ जुलै २०२१ पासून ३१% दराने महागाई भत्ता अनुज्ञेय राहिल.
- दिनांक २ डिसेंबर २०२१ च्या शासन पत्रान्वये केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या दिनांक २७ ऑक्टोबर २०२१ च्या ज्ञापनान्वये, दिनांक १ जुलै २०२१ पासून महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना वाढीव ३% महागाई भत्ता लागू करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १ जुलै २०२१ पासून ३१% दराने महागाई भत्ता अनुज्ञेय राहिल.
- दिनांक ३ डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये सीपीटीपी-६ अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या मंत्रालयीन कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गातील उमेदवारांच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता निर्माण करण्यात आलेल्या १८ अधिसंख्य पदांना दिनांक ४ ऑक्टोबर २०२१ पासून पुढे सीपीटीपी-६ मधील गट-ब प्रशिक्षणार्थी परिविक्षाधीन अधिकाऱ्यांची तात्पुरती सेवाज्येष्ठता तयार होण्याच्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ३ डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये सीपीटीपी-५ अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या मंत्रालयीन कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गातील उमेदवारांच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता निर्माण करण्यात आलेल्या १२ अधिसंख्य पदांना दिनांक ४ ऑक्टोबर २०२१ पासून पुढे सीपीटीपी-५ मधील गट-ब प्रशिक्षणार्थी परिविक्षाधीन अधिकाऱ्यांची तात्पुरती सेवाज्येष्ठता तयार होण्याच्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक १० डिसेंबर २०२१ च्या शासन पत्रान्वये केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या दिनांक ७ सप्टेंबर २०२१ च्या ज्ञापनातील तरतुदी महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील दिनांक १ जानेवारी २०२१ ते ३० जून २०२१ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना (भाप्रसे / भापोसे / भावसे) लागू करण्यात आल्या आहेत.
- दिनांक १३ डिसेंबर २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या ५ जिल्हा उपनिबंधक, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक १४ डिसेंबर २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या २ सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक १३ डिसेंबर २०२१ च्या शासन ज्ञापनान्वये महाराष्ट्र संवर्गातील भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांची सन २०२१ (As on १.१.२०२२) ची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे (IPR) Online पद्धतीने सादर करण्याची कार्यपद्धती विहित केली आहे.
- दिनांक १५ डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मधील संगणक, प्रिंटर व स्कॅनर दुरुस्तीसाठी तसेच त्यांचे नवीन सुटे भाग पुरवठा करण्यासाठी मे.कॉपी क्लासिक, मुंबई यांच्याशी तीन महिन्यासाठी (दिनांक १५ डिसेंबर २०२१ ते २८ फेब्रुवारी २०२२) सेवा संविदेचा करार करण्यात आला आहे.

- दिनांक १६ डिसेंबर २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या एका उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक १६ डिसेंबर २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या एका सहायक राज्यकर आयुक्त, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक २ डिसेंबर २०२१ च्या शासन पत्रान्वये हयातीचा दाखला सादर करण्याबाबतचे केंद्र शासनाचे दिनांक २० सप्टेंबर २०२१ च्या ज्ञापन महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील सर्व सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या माहितीसाठी अग्रेषित करण्यात आले आहे.
- दिनांक १७ डिसेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्याबाबतची कार्यवाही दिनांक ३१ डिसेंबर पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना आहेत.
- दिनांक १७ डिसेंबर २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या एका उपजिल्हाधिकारी, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक १७ डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्तीसंदर्भात जाहिराती प्रसिद्ध नसल्याने, या कालावधीत काही उमेदवारांची कमाल वयोमर्यादा ओलांडली गेली असल्याने, त्यांची परीक्षेस बसण्याची संधी हुकली आहे, अशा उमेदवारांना स्पर्धा परीक्षांना बसण्यासाठी संधी उपलब्ध करुन देण्यासाठी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
- दिनांक २० डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे / मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद / डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थांना कार्यालयीन खर्चाकरिता अनिवार्य ३०-सहायक अनुदान (वेतनेतर) या उद्दीष्टांखाली तिन्ही संस्थांना अनुक्रमे रु.५८.८० लाख, रु.२.२० लाख आणि रु.२.२० लाख इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.
- दिनांक २२ डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा तत्त्वावर २० टक्के पदे भरण्याच्या मर्यादेस दिनांक ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच २० टक्के पदांची कशी गणना करण्यात यावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.
- दिनांक २९ डिसेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये भाप्रसे अधिकाऱ्यांची बदली झाल्यावर त्यांच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रासोबतच मूळ सेवापुस्तक पाठविण्याच्या सूचना आहेत.
- दिनांक ३० डिसेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्याबाबतची कार्यवाही दिनांक ३१ जानेवारी २०२२ पर्यंत पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(ख) प्रशिक्षण / परीक्षा**

- दिनांक २२ डिसेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी यांच्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी सन २०२१ मध्ये घ्यावयाच्या विभागीय परीक्षेच्या प्रशिक्षण आणि परीक्षेसाठी अर्ज दिनांक १५ जानेवारी २०२२ पर्यंत पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक २२ डिसेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभाग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय यामधील सहायक कक्ष अधिकाऱ्यांसाठी सन २०२१ मधील सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा दिनांक १९ व २० जानेवारी २०२२ रोजी सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.
- दिनांक २२ डिसेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०२१ चा ५३० उमेवारांचा निकाल जाहिर करण्यात आला आहे.

- दिनांक ३१ डिसेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यायलयातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीव्दारे नियुक्ती देण्यासाठी दिनांक ६ मार्च २०२२ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०२१ फक्त मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.

**(ग) नियुक्ती / पदोन्नती / प्रपत्र बढती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- एका लिपिक-टंकलेखकाला सहायक कक्ष अधिकारी पदी पदोन्नती देण्यात आली आहे.
- १०१ लिपिक-टंकलेखकांना सहायक कक्ष अधिकारी पदाच्या पदोन्नतीचा नियमित दिनांक देण्यात आले आहेत.
- एका निन्मश्रेणी लघुलेखकास प्रपत्र बढती देण्यात आली आहे.
- ६ अवर सचिवांच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- उपसचिव-१, अवर सचिव-२, कक्ष अधिकारी-३ अशा ६ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.
- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-२ अशा ४ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१, लिपिक टंकलेखक-१ अशा ४ अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- ५ लिपिक-टंकलेखकांच्या अधिग्रहित केलेल्या सेवेच्या कालावधीत वाढ करण्यात आली आहे.

**(च) ज्येष्ठतासूची**

- दिनांक ६ डिसेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील ३ कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ७ डिसेंबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील व्यवस्थापकीय बाजूच्या गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०२१ या कालावधीतील सुधारित अंतिम सामायिक ज्येष्ठतासूची ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****